| अ. क्र. | कामाचे स्वरुप | शासन आदेश/पत्र | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| | शौचालये व वापरकर्ते कुटुंब यांचा शोध घेणे | | |
| | ii) गेल्या ८ ते १० वर्षापासून वापरात असलेल्या २ खड्डयांच्या शौचालयांचा सद्य:स्थितीत सुरु असलेला प्रथम खड्डा बंद करुन, दुसऱ्या खड्डयामध्ये मल प्रवाहीत करणे. | | दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ५ |
| ५. | i) शाश्वत स्वच्छता आराखडयातून सोनखत तयार झालेली शौचालये व वापरकर्ते कुटुंब यांचा शोध घेणे. | | दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत |
| | ii) शौचालयाच्या खड्डयामधून सोनखत काढून खड्डा रिकामा करणे. | | दर तीन महिन्यांमध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १ खड्डा रिकामी करणे अनिवार्य आहे. |
| ६. | घनकचऱ्यांचे जागेवर विलगीकरण करणे व व्यवस्थापन करणे. | संदर्भाधीन क्रमांक २ ते ६ | दर महिन्याला प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ८ गावांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे. |
| ७. | सांडपाण्याकरिता शोष खड्डे तयार करणे | संदर्भाधीन क्रमांक २ ते ६ | दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १० कुटुंबांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे. |

जिल्हास्तरावरुन होत असलेल्या प्रचार प्रसिध्दी व जनजागृती कार्यक्रमांतर्गत उपरोक्त तक्ता “अ” बाबींसंदर्भात प्राथम्याने कार्यवाही होईल याची दक्षता घेण्यात यावी. याकरिता होणारा खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद या उपलेखा शिर्षातून भागविण्यात यावा. उपरोक्तनुसार तक्ता “अ” मध्ये नेमून दिलेल्या कालमर्यादेत कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे सर्व जिल्हा परिषदांना बंधनकारक आहे. दिनांक ०२ ऑक्टोंबर,२०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील ग्रामीण भागात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनेतंर्गत

मोठया प्रमाणावर समारंभ / कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे. सदर समारंभ / कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपरोक्तनुसार कार्यवाही विहित कालमर्यादेत होणे आवश्यक आहे.

तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त दिनांक २ ऑक्टोंबर,२०१९ रोजी प्रत्येक जिल्हा परिषदेने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनेतंर्गत खालीलप्रमाणे शुभारंभ कार्यक्रम आयोजित करावेत:-

१. संदर्भाधीन क्रमांक १७ येथील शासन पत्रान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील सर्व २७६६८ ग्रामपंचायतींना Electric Type Sanitary Napkins Disposal Machine/ Incinerator (इलेक्ट्रीक टाईप सॅनिटरी नॅपकीन्स डिस्पोजल मशिन/इन्सिनरेटर) खरेदीसाठी एकूण रुपये एकोणीस कोटी,छत्तीस लक्ष,शहात्तर हजार इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानुषंगाने प्रत्येक जिल्हा परिषदेने प्रत्येक तालुक्यातील कोणत्याही एका ग्रामपंचायतीची निवड करुन, सदर ग्रामपंचायतीमध्ये दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत Electric Type Sanitary Napkins Disposal Machine/Incinerator (इलेक्ट्रीक टाईप सॅनिटरी नॅपकीन्स डिस्पोजल मशिन/इन्सिनरेटर) स्थापित करावे व संबंधित सरपंच यांचे हस्ते दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ रोजी सकाळी ११ वाजता सदर मशिनचे उदघाटन करण्यात यावे.

२. प्रत्येक जिल्हा परिषदेने जिल्हयातील कोणत्याही ग्रामपंचायतीमधील पूर्ण खड्डा भरलेल्या व सोनखत तयार झालेल्या शौचालयाची निवड करावी. सदर शौचालयाच्या खड्ड्यातील सोनखत उपसा करण्याची कार्यवाही दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१९ रोजी सकाळी ११ वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे उपस्थितीत करावी.

३. प्रत्येक जिल्हा परिषदेने प्रत्येक तालुक्यातील एक खड्डा असलेले शौचालय व त्याचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करण्याकरिता पुरेशी जागा आहे, अशा शौचालयांची माहिती त्या त्या जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या व तालुक्यांच्या शाश्वत स्वच्छता आराखडयात उपलब्ध आहे,अशा शौचालयांची पाहणी करुन त्या शौचालयांच्या वापरकर्ते कुटुंबाला दोन खड्डा शौचालयांच्या निकडीबाबत समुपदेशन करावे, त्यांना शास्त्रोक्त पध्दतीने दोन खड्डा शौचालय बांधण्यास प्रवृत्त करावे व त्याप्रमाणे एक खड्डा शौचालयाचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी. याप्रकारे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक खड्डा शौचालयाचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही केलेल्या कुटुंबाला भेट देऊन त्या कुटुंब प्रमुखाचा दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे हस्ते सत्कार करावा.

४. प्रत्येक जिल्हा परिषदेने जिल्हयातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधील कार्यरत सफाई कर्मचारी किंवा कार्यरत कर्मचारी यांना आरोग्य व स्वच्छता विषयक प्रशिक्षण देण्याकरिता प्रत्येक पंचायत समितीस्तरावर दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ ते ९ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत आरोग्य व स्वच्छता विषयक प्रशिक्षण आयोजित करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१११११४४२१५२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.07.11 16:56:09 +05'30'

(स्मिता. स. राणे)
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
६. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
८. उपसचिव तथा प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
९. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.
१०.विभागीय आयुक्त, सर्व.
११.जिल्हाधिकारी, सर्व.
१२.महासंचालक ,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व.
१५.उपायुक्त (विकास), सर्व.

१६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९. निवडनस्ती, पापु-१६.

**हागणदारीमुक्त ग्राम पंचायतींच्या दुसऱ्या टप्प्यातील पडताळणीचे मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे बाबत.**

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१९/प्र.क्र. १९०/पापु-१६

७ वा मजला, गोकुळदास रुग्णालय संकुल इमारत
टिळक रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १८ जुलै, २०१९.

वाचा -

१. **संयुक्त सचिव, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), पेयजल एवं स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक:-** एस-११०११/३/२०१५-एसबीएम, दिनांक ९ जून, २०१५, दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ व दिनांक ६ डिसेंबर, २०१८.
२. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक:** स्वभामि-**२०१५/** प्र.क्र.**१८१/** पापु-८, दिनांक **२७** ऑक्टोंबर, **२०१५.**
३. **संयुक्त सचिव, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), पेयजल एवं स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक:-**एस-११०११/७/२०१८-एसबीएम, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१८.

प्रस्तावना-

देशातील ग्रामीण भागात शाश्वत स्वच्छता निर्माण व्हावी, या उद्देशाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या अभियानाची संपुर्ण देशभर दिनांक २ ऑक्टोंबर, २०१४ रोजी सुरूवात करण्यात आली आहे. संपूर्ण देश दिनांक २ ऑक्टोंबर, २०१९ रोजी हागणदारीमुक्त करण्याचा निर्णय केंद्र शासनाकडून घेण्यात आला आहे. केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार व पायाभूत सर्वेक्षणातील कुटुंबांच्या यादीनुसार, ग्रामीण महाराष्ट्र दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आला आहे.

०२. हागणदारीमुक्त झालेल्या सर्व ग्रामपंचायतींची पहिल्या टप्प्यातील पडताळणी करण्याबाबत, संदर्भाधीन क्रमांक २ येथील, शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोंबर, २०१५ अन्वये, निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार पहिल्या टप्प्यातील पडताळणी पुर्ण झाली आहे.

०३. हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये, निर्माण झालेल्या स्वच्छता सुविधांचा कुटुंबातील प्रत्येक सदस्यांनी वापर करणे, आणि स्वच्छता सुविधांची शाश्वतता अबाधित ठेवणे आवश्यक आहे. याकरिता केंद्र शासनाने संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ०६ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये

हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतींची दुस-या टप्प्यातील पडताळणी प्रक्रिया निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

०४. केंद्र शासनाने दिलेले निर्देश विचारात घेवून, राज्यातील सर्व हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींची, दुसऱ्या टप्प्यातील पडताळणी प्रक्रिया निश्चित करण्यासाठी, मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या योजनेंतर्गत, राज्यातील सर्व हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींची, दुसऱ्या टप्प्यातील पडताळणी प्रक्रिया निश्चित करण्यासाठी, खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

०२. दुसऱ्या टप्प्यातील पडताळणी प्रक्रियेमध्ये, ग्रामपंचायतीमधील शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र व सार्वजनिक ठिकाणे (उदा. बाजारपेठ, यात्रास्थळ, वर्दळीची ठिकाणे इ.) व सर्व कुटुंबांची स्वच्छतेच्या अनुषंगाने पडताळणी करणे, याबाबींचा समावेश असेल.

०३. केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे, दुसऱ्या टप्प्यातील पडताळणी प्रक्रिया पार पाडण्यासाठी, जिल्हा स्तरावरून, प्रत्येक गावाकरिता समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत तथापि महाराष्ट्र राज्याची भौगोलिक स्थिती व गावांची संख्या विचारात घेता, पडताळणीची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी, प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय समिती गठीत करणे आवश्यक आहे. समिती गठीत करण्याचे पुर्ण अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात येत असून, समिती गठीत करण्याबाबत त्यांनी संबधितांना निर्देश द्यावेत. प्रत्येक समितीमध्ये कमीत कमी २ व जास्तीत जास्त ६ सदस्यांचा समावेश असेल. पडताळणी प्रक्रियेकरिता अ) प्राथमिक पडताळणी समिती ब) फेर पडताळणी समिती अशा दोन प्रकारच्या समित्या गठीत करण्यात याव्यात.

**०४. समितीचे गठण:-**

**अ) प्राथमिक पडताळणी समिती:-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीकरिता विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखालील, प्राथमिक समिती गठीत करण्याबाबत, संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना निर्देश द्यावेत. या समितीचे कार्यक्षेत्र ग्रामपंचायत स्तरावरील पडताळणी पुरते मर्यादित राहील.

प्राथमिक पडताळणी तपासणी समितीमध्ये, १. केंद्र प्रमुख २. अंगणवाडी पर्यवेक्षिका ३. संबधित ग्रामपंचायतीमधील एक अंगणवाडी सेविका ४. संबधित ग्रामपंचायतीमधील एक मुख्याध्यापक अथवा त्यांचे प्रतिनिधी ५. संबधित ग्रामपंचायतीमधील एक स्वच्छाग्रही ६. संबधित ग्रामपंचायतीमधील एक

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्य ७. संबधित ग्रामपंचायतीमधील एक आशा सेविका ८. संबधित ग्रामपंचायतीमधील महिला बचत गटाच्या एक सदस्या ९. संबधित ग्रामपंचायतीमधील जलसुरक्षक, इत्यादी पैकीच ६ सदस्य राहतील. या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्यानुसार, प्रत्येक समितीमध्ये आवश्यकतेनुसार कमीत कमी २ व जास्तीत जास्त ६ सदस्यांचा समावेश करण्यात यावा. उपरोक्त ९ सदस्यांपैकी समितीमध्ये कोणाचा सदस्य म्हणून समावेश करावा, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना पुर्ण अधिकार द्यावेत.

वरील समितीतील सदस्यांची नावे प्रपत्र-अ प्रमाणे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाकडे गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सादर करावीत. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर, जिल्हा कक्षातील सल्लागारांनी प्रत्येक सदस्यांसाठी login-id (लॉगिन आय.डी ) आणि Password (पासवर्ड) तयार करावेत. login-id (लॉगिन आय.डी )आणि Password (पासवर्ड) तयार करून ते गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना द्यावेत. त्यानंतर तालुक्याच्या गटविकास अधिकारी, यांनी त्यांच्या तालुक्यातील विस्तार अधिकारी यांना, त्यांच्या अधिनस्त असलेल्या सदस्यांना, Mobile App च्या माध्यमातून ग्रामपंचायतीतील कुटुंबांचे वाटप करावे. कुटुंबांचे वाटप करताना, एकाच सदस्याला सारख्याच नावाची दोन कुटुंबे पडताळणीसाठी दिली जाणार नाहीत तसेच एकाच सदस्याला जास्त प्रमाणात कुटुंबांचे वाटप होणार नाही, याची दक्षता घ्यावी. (Mobile App ( मोबाइल ॲप) संदर्भातील सविस्तर सूचना लवकरच देण्यात येतील)

ग्रामपंचायतीमधील खालीलप्रमाणे कुटुंब संख्या विचारात घेवून, प्राथमिक पडताळणी समिती सदस्य संख्या निश्चित करावी.

| प्रत्यक्ष कुटुंब संख्या | एकूण सदस्यांची संख्या |
|---|---|
| २०० पर्यन्त | २ सदस्य |
| २०१ ते ५०० पर्यन्त | ३ सदस्य |
| ५०१ ते १००० पर्यन्त | ५ सदस्य |
| १००० पेक्षा जास्त | ६ सदस्य |

**प्राथमिक पडताळणी समितीने करावयाची कार्यवाही व समितीची जबाबदारी :-**

**i) गावातील कुटुंबांच्या शौचालयांची पडताळणी:-**

पायाभूत सर्वेक्षण २०१२ मध्ये समाविष्ठ असणारे (BLS- Base Line Survey), पायाभूत सर्वेक्षण २०१२ मधून सुटलेले (LOB- Left Over Base Line Survey) व पायाभूत सर्वेक्षण २०१२ नंतरची वाढीव कुटुंबे, या सर्व कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी द्याव्यात. या भेटीमध्ये कुटुंबातील एकूण सदस्यांची संख्या,

शौचालयाची उपलब्धतता/वापर, शौचालयाचा प्रकार, सेप्टीक टँकचे शौचालय असल्यास गॅस पाईप, मैला व्यवस्थापनासाठी शोषखड्डा व पाणी इ. बाबींची उपलब्धतता, कुटुंबस्तरावर करण्यात आलेले घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन, इत्यादी बाबींची पडताळणी करण्यात यावी.

कुटुंबातील सदस्यांच्या हात धुण्याच्या सवयी, वैयक्तिक स्वच्छता, घराच्या परिसरातील स्वच्छता व पाणी हाताळण्याच्या पद्धती इ. बाबींचे निरिक्षण करावे. जे कुटुंब सामुहिक अथवा सार्वजनिक शौचालयाचा वापर करित असतील, तर त्या शौचालयांची पडताळणी करावी.

**ii) गावातील सार्वजनिक शौचालयांची पडताळणी:-**

सार्वजनिक शौचालयाची पडताळणी करताना, शौचालयाचे बांधकाम कोणत्या योजनेमधून करण्यात आले, शौचालयामध्ये महिला व पुरुषांकरिता किती सीट्स उपलब्ध आहेत, महिला व पुरुषांकरिता मुता-यांची संख्या, शौचालयावर लावण्यात आलेले दिशादर्शक फलक, शौचालयावर लिहिण्यात आलेले स्वच्छतेचे संदेश, शौचालयाची स्वच्छता व वापराकरिता पाण्याची उपलब्धता, शौचालयाच्या परिसरातील स्वच्छता, देखभाल व दुरूस्तीचे नियोजन, सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशिनची उपलब्धतता तसेच, शौचालय वापराच्या अनुषंगाने, दिव्यांग व्यक्तिंसाठी पुरविण्यात आलेल्या सुविधा, इ. बाबींची पाहणी करावी.

**iii) गावातील शाळांची पडताळणी:-**

गावातील शाळांकरिता उपलब्ध असलेल्या शौचालयांची पडताळणी करताना, बांधकाम कोणत्या योजनेमधून करण्यात आले, विद्यार्थ्यांची एकूण संख्या, मुले व मुलींकरिता स्वतंत्र शौचालय व मुता-यांची उपलब्धता, शौचालयावर लावण्यात आलेले दिशादर्शक फलक, शौचालयावर लिहिण्यात आलेले स्वच्छतेचे संदेश, शौचालयाची स्वच्छता व वापराकरिता पाण्याची उपलब्धता, शौचालयाच्या परिसरातील स्वच्छता, देखभाल व दुरूस्तीचे नियोजन, आवश्यकतेनुसार सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशिनची उपलब्धतता, तसेच शौचालय वापराच्या अनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात आलेल्या सुविधा अथवा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शौचालय सुविधा, हात धुण्याची सुविधा, पोषण आहारातील उरलेल्या अन्नाची व खरकट्याची विल्हेवाट, शालेय शौचालय स्वच्छ राखण्यासाठीचे नियोजन, माहिती, शिक्षण व संवाद अंतर्गत राबविण्यात आलेले विविध उपक्रम, सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. बाबींची पाहणी करावी.

**iv) गावातील अंगणवाडीची पडताळणी:-**

गावातील अंगणवाडीकरिता उपलब्ध असलेल्या शौचालयांची पडताळणी करताना, बांधकाम कोणत्या योजनेमधून करण्यात आले, विद्यार्थ्यांची एकूण संख्या, शौचालय व मुता-यांची उपलब्धता, शौचालयावर लिहिण्यात आलेले स्वच्छतेचे संदेश, शौचालयाची स्वच्छता व वापराकरिता पाण्याची उपलब्धता, शौचालयाच्या परिसरातील स्वच्छता, देखभाल व दुरूस्तीचे नियोजन, शौचालय

वापराच्या अनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात आलेल्या सुविधा, हात धुण्याची सुविधा, पोषण आहारातील उरलेल्या अन्नाची व खरकट्याची विल्हेवाट, अंगणवाडी शौचालय स्वच्छ राखण्यासाठीचे नियोजन, माहिती, शिक्षण व संवाद अंतर्गत राबविण्यात आलेले विविध उपक्रम, सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. बाबींची पाहणी करावी.

**v) गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र/ उपकेंद्र, सार्वजनिक कार्यालये/ ठिकाणे पडताळणी:-**

गावातील वरील कार्यालयांकरिता उपलब्ध असलेल्या शौचालयांची पडताळणी करताना, बांधकाम कोणत्या योजनेमधून करण्यात आले, शौचालय व मुता-यांची उपलब्धता, शौचालयावर लिहिण्यात आलेले स्वच्छतेचे संदेश, शौचालयाची स्वच्छता व वापराकरिता पाण्याची उपलब्धता, शौचालयाच्या परिसरातील स्वच्छता, देखभाल व दुरूस्तीचे नियोजन, शौचालय वापराच्या अनुषंगाने दिव्यांगाकरिता पुरविण्यात आलेल्या सुविधा, हात धुण्याची सुविधा, शौचालय स्वच्छ राखण्यासाठीचे नियोजन, घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. बाबींची पाहणी करावी.

गावातील हागणदारीच्या ठिकाणांची पडताळणी करताना, यापूर्वी हागणदारीकरिता वापर करण्यात येणा-या ठिकांणाची स्वच्छता, त्या जागेचा सद्य:स्थितीत करण्यात येणारा वापर, इत्यादी बाबी विचारात घ्याव्यात.

**vi) पडताळणीच्या नोंदी: -**

वरील प्रमाणे पडताळणी करण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा कडून Mobile App (मोबाइल ॲप) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर App विहित कालावधीत उपलब्ध न झाल्यास, या शासन निर्णया सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ ते ५ नुसार पडताळणी करून घेवून, पडताळणीचा गोषवारा, गोषवारा प्रपत्र-A ते E मध्ये सादर करणे आवश्यक राहील. तदनंतर पडताळणीमध्ये प्राप्त झालेली माहिती उपलब्ध करून देण्यात आलेल्या मोबाईल ॲप मध्ये भरावी लागेल, या अटीस अधीन राहून, ग्रामपंचायतींची पडताळणी करून घेण्याची परवानगी, प्राथमिक पडताळणी समितीस राहील.

प्राथमिक समितीने एका गावाची जास्तीत जास्त ४ दिवसांच्या आत पडताळणी करावी. तथापि एखादी ग्रामपंचायत अतिदुर्गम भाग वा डोंगराळ भागामध्ये असल्यास, सदरचा कालावधी शिथिल करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील. तपासणी कालावधी वाढविणे अपरिहार्य असल्यास, त्यासंदर्भातील वस्तुस्थितीदर्शक कारणे, प्राथमिक पडताळणी समितीने संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावीत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या परवानगीनंतरच अशा प्रकारच्या मुदतवाढ दिलेल्या गावाची पडताळणी करण्यात यावी. तथापि मुदतवाढीचा कालावधी आठ

दिवसापेक्षा जास्त असू नये. समिती सदस्यांना शासन निर्णयातील परिच्छेद- ४ (क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहिल.

**vii) अहवाल सादर करणे-**

वरील समितीने पडताळणी पूर्ण केल्यानंतर आठ दिवसाच्या आत पडताळणीचा अहवाल गटविकास अधिकारी यांच्याकडे विहित प्रपत्रात सादर करावा.

**ब) फेर पडताळणी समिती:-**

प्राथमिक पडताळणी समितीने पडताळणी पुर्ण केल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रत्येक तालुक्याकरिता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली फेर पडताळणी समिती गठीत करावी. या समितीचे कार्यक्षेत्र जिल्हा स्तरावरील पडताळणी पुरते मर्यादीत राहील. या समितीमध्ये १) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील संबधित तालुक्याचे तालुका समन्वयक २. संबधित तालुक्याचे विभाग प्रमुख ३. विस्तार अधिकारी दर्जाचे अधिकारी ४. संबधित तालुक्याचे गट संसाधन केंद्र (Block Resource Centre- BRC) / समूह संसाधन केंद्र ( Cluster Resource Centre- CRC ) यांचा समावेश असेल. सदर समितीतील सदस्यांना या तपासणीकरिता कोणतेही मानधन अनुज्ञेय राहणार नाही. या समितीस जिल्हा स्तरावरून वाहनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. जिल्हा कक्षाकडे वाहन उपलब्ध नसल्यास, पडताळणी कालावधी पुरते (जास्तीत जास्त १ महिना मुदतीसाठी) भाडे तत्वावर वाहन घेण्यात यावे. सदरचा खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद या लेखाशिर्षाखाली जिल्हा स्तरावर मंजूर असलेल्या निधीमधून करावा.

**फेर पडताळणी समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील :-**

- गट विकास अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार फेर पडताळणी समितीने, एकूण ग्रामपंचायतीमधील ५ % ग्रामपंचायतींची तपासणी करणे.
- उपरोक्त प्रमाणे निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमध्ये, एक हजार कुटुंब संख्या असल्यास ५ %, एक हजार पेक्षा जास्त कुटुंब संख्या असल्यास ४ % व पाच हजार पेक्षा जास्त कुटुंब संख्या असल्यास १ %, कुटुंबांची पडताळणी करावी. कुटुंबांची निवड करताना, संबधित ग्रामपंचायतीमधील सर्व गावे समाविष्ट होतील अशा प्रकारे निवड करावी. तसेच भेटी द्यावयाची कुटुंबे याद्दच्छिक नमुना ( Random Sampling ) पद्धतीने निवडावीत.
- निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमधील एक शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र (असल्यास), सार्वजनिक शौचालय यांची पाहणी करावी.
- निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमधील, कुटुंबांना उपलब्ध असणा-या पाण्याच्या सुविधेची तपासणी व पाहणी करावी.

- निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमधील, कुटुंबातील सदस्यांचे शौचालय व स्वच्छता विषयक सवयीच्या बाबतीत भेटी देवून, फेरतपासणी करावी.
- वरील फेर पडताळणी करताना समितीने अ ( i ते vii ) येथे नमूद करण्यात आलेले मुद्दे विचारात घ्यावेत आणि प्रपत्र १ ते ५ प्रमाणे फेर पडताळणी करावी तसेच शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या गोषवारा प्रपत्र A ते E मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अहवाल सादर करावा.
- फेर पडताळणीमध्ये प्राथमिक समितीने दिलेल्या अहवालापेक्षा विपरित माहिती प्राप्त झाल्यास प्राथमिक पडताळणी समितीतील सदस्यांचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.
- फेर पडताळणी समितीने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अहवाल सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने सदर ग्रामपंचायत हागणदारीमुक्त आहे किंवा नाही ? याबाबत पडताळणी पूर्ण झाल्यानंतर ७ दिवसामध्ये या अनुषंगाने प्रपत्र-ब नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर करावे. सोबतच सदर ग्रामपंचायतींची पडताळणी झाल्याची माहिती केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या, पेयजल व स्वच्छता विभागाच्या https://sbm.gov.in या संकेतस्थळावर (C २४-second level verification for ODF village) या दुव्यातून नोंदीत करण्यात यावी.

**क) निधी वितरण :-**

प्राथमिक पडताळणी समिती सदस्यांना संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार प्रति गाव प्रति सदस्य रुपये १०००/- (रूपये एक हजार मात्र) इतके मानधन अनुज्ञेय राहील. याकरिता प्रवास भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत. सदरचा खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद या लेखाशिर्षाखाली जिल्हास्तरावर मंजूर असलेल्या निधीमधून करावा.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्राथमिक पडताळणी समितीचा अहवाल, प्रपत्र १ ते ५ प्रमाणे जिल्हास्तरावर सादर केल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्राथमिक पडताळणी समितीतील सदस्यांचे मानधन गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना वितरित करावे. तद्नंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तालुका स्तरावरून RTGS प्रणाली द्वारे पडताळणी समिती मधील संबधितांना मानधन अदा करण्यात यावे. सदरचा खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करावा.

**ड) पडताळणी कालावधी :-**

प्रस्तूत शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर, उपरोक्त दोनही पडताळणी समितीचे गठण, जिल्हास्तरीय बैठक, समिती सदस्यांची नावे व पदनाम, संपर्क क्रमांक इत्यादी संदर्भातील माहिती जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने संकलित करावी. तसेच प्रशिक्षणाचे वेळापत्रक, जिल्हानिहाय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण, मास्टर ट्रेनर्स यांची सुद्धा निवड करावी, हि सर्व कामे शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून १० दिवसाच्या कालावधीमध्ये करावीत. त्यापुढील एका आठवड्याच्या कालावधीमध्ये राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम होवून, त्याच आठवड्यात जिल्हास्तरीय प्रशिक्षणे पुर्ण करावीत. तदनंतर प्रथम पडताळणी कार्यक्रम घेवून, तालुका पुर्ण झाल्यास त्वरीत फेरपडताळणी कार्यक्रम राबवावा. सदर सर्व कामे, दिनांक १० ऑगष्ट, २०१९ पर्यंत पुर्ण करावीत. सदर कालावधीमध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास, त्यासंदर्भातील अधिकार शासनास राहतील.

**इ )प्रशिक्षण-**

प्राथमिक पडताळणी समितीतील सदस्यांना तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी, राज्य स्तरावर प्रशिक्षक तयार केले जातील. यामध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) , जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील संनियंत्रण व मूल्यमापन सल्लागार, मनुष्यबळ विकास सल्लागार, स्वच्छता शाखेतील एक सल्लागार, माहिती शिक्षण व संवाद सल्लागार यांचा समावेश असेल.

राज्य स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी, प्रशिक्षण मोड्यूल विकसित करण्यात आले असून, राज्य स्तरावर प्रशिक्षण देण्यात आलेल्या प्रशिक्षकांनी, त्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर, पुढील आठवड्यात जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील इतर सल्लागार, तालुका संसाधन कक्षातील (BRC) सल्लागार, पडताळणी समितीतील सदस्य यांना प्रशिक्षण द्यावे.

**ई) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाची जबाबदारी :-**

- ग्रामपंचायतींची पडताळणी करण्यापुर्वी संबधित ग्रामपंचायतींना आठ दिवस अगोदर लेखी सूचना देणे.
- समितीमध्ये अंतर्भूत असलेल्या सदस्यांना, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील संबधित तालुक्याच्या समन्वयकाने एक दिवसीय प्रशिक्षण तालुका स्तरावर देणे.
- शाश्वत स्वच्छतेच्या टप्प्यात आवश्यक असलेल्या भुमिका व जबाबदाऱ्या प्रभावीरित्या पार पाडण्यासाठी उपरोक्त दोन्ही समित्यांचे अध्यक्ष व सदस्य यांची क्षमता बांधणी करणे..

- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी, पडताळणी प्रक्रियेचे सनियंत्रण करणे व कार्यक्रमाचा आढावा घेवून, त्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करणे.
- पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी, स्वच्छाग्रही/महिला बचत गट यांना मार्गदर्शन करणे व कामाचा आढावा घेणे.
- फेर पडताळणी करावयाच्या ग्रामपंचायतींची यादी तयार करणे आणि फेर पडताळणीचे नियोजन करणे.
- प्राथमिक पडताळणीसाठी तयार करण्यात आलेल्या मोबाइल App ची माहिती समिती सदस्यांना देणे.
- मोबाइल App मधून संबधित समिती सदस्यांना पडताळणी करावयाच्या ग्रामपंचायत/ गाव/ वाड्या यांचे जिल्हा स्तरावरून वाटप करणे , मोबाइल यूजर्स (Mobile Users) तयार करणे.
- मोबाइल App बाबत तांत्रिक अडचणी उद्भवल्यास, सदर तक्रारींचे निवारण करण्यासाठी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो), बेलापूर यांच्याकडे पाठपुरावा करणे.
- ग्रामपंचायतीची पडताळणी पुर्ण झाल्यानंतर यासंदर्भातील नोंद केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या संकेतस्थळावर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०७१७१६५११८१२२८**असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2019.07.18 13:15:35 +05'30'

**(चं. कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव .
३. मा. मुख्य सचिव यांचे सचिव.
४. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव.

५. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव.
६. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
७. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
८. विभागीय आयुक्त (सर्व).
९. जिल्हाधिकारी (सर्व).
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
११.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१२.अधिक्षक अभियंता विभागीय भारत निर्माण कक्ष.
१३.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)/( पाणी व स्वच्छता ), जिल्हा परिषद (सर्व).
१४. गटविकास अधिकारी पंचायत समिती, सर्व.
१५.निवड नस्ती, कार्यासन. पा.पु. ( १६ ).

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक १ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पायाभूत सर्वेक्षण २०१२ मधील कुटुंब आणि पायाभूत सर्वेक्षण २०१२ मधून सुटलेल्या कुटुंबांची माहिती (SBM-MIS वर उपलब्ध असलेली कुटुंबे) | | | | | | | | | |
| पडताळणीचा दिनांक- | | | | | | | | | |
| जिल्हा- | | तालुका- | ग्राम पंचायत नाव- | | गावाचे नाव- | | | वाडीचे नाव | |
| कुटुंब स्तर शौचालय सुविधा,वापर,स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती | | | | | | | | | |
| अ क्र | लाभार्थ्याचा ओळखपत्र क्रमांक (Beneficiary ID as per SBM MIS) | कुटुंब प्रमुखाचे नाव | घर क्रमांक नमूद करावा | रेशन कार्ड क्रमांक नमूद करावा | कुटुंबांतील एकूण सदस्य संख्या | कुटुंबातील ५ वर्षाखालील मुलांची एकूण संख्या. | कुटुंबातील एकूण दिव्यांग सदस्य संख्या. | सदर कुटुंबाकडे स्वत:चे वैयक्तिक शौचालय आहे किंवा नाही | स्वत: चे वैयक्तिक शौचालय नसल्यास शौचालय वापराचा खालील पैकी प्रकाराचा क्रमांक नमूद करावा २. सामायिक शौचालय ४. समुदाय शौचालय ६. सार्वजनिक शौचालय ८. उघड्यावर जातात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक १ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुटुंबस्तर शौचालय सुविधा, वापर, स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती | | | | | | | | | | | |
| अ क्र | कुटुंब प्रमुखाचे नाव | वैयक्तिक शौचालय असल्यास | | | | | | शौचालयाचा वापर करण्यात येतो किंवा कसे ?<br>१. होय २. नाही | वापर असल्यास किती सदस्य वापरतात? | वापर नसल्यास खालीलपैकी कारण नमूद करावे.<br>१. पाणी नाही<br>२. नादुरुस्त आहे<br>३. मानसिकता नाही | छोट्या मुलांचे शौच कोठे टाकण्यात येते ?<br>१. शौचालयात<br>२. उघड्यावर |
| | | शौचालयाच्या खालील पैकी तांत्रिक प्रकार नमूद करावा<br>२. एक शोषखड्डा<br>४. दोन शोषखड्डा<br>६. सेप्टिक टँक<br>८. बायोग्यस<br>१०. इतर | एक शोषखड्डा खड्डा शौचालय असल्यास शौचालय साधारणत: किती वर्षापूर्वी बांधले ? | दोन शोष खड्डा शौचालय असल्यास एक खड्डा भरलेला आहे का ?<br>१. होय २. नाही | सेप्टिक टँक चे असल्यास खालील पैकी क्रमांक नमूद करावा<br>२. सेप्टिक टँक च्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे<br>४.मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे<br>६. मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे | सेप्टिक टँक चे शौचालय असल्यास गॅस पाईप बसविण्यात आला आहे का?<br>१. आहे<br>२. नाही | दिव्यांग सदस्य असल्यास दिव्यांग सुलभ शौचालय व्यवस्था आहे का?<br>१. होय<br>२. नाही | | | | |
| | | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक १**

**कुटुंब स्तर शौचालय सुविधा,वापर,स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती**

| अ क्र | कुटुंब प्रमुखाचे नाव | पाण्याची उपलब्धता | | कुटुंबातील किती सदस्यांना हात धुण्याच्या पाच पद्धतीप्रमाणे साबणाने / राखेने हात धुण्याची सवय आहे ? | एकंदरीत घरातील स्वच्छता कशी आहे ? १. चांगली २. मध्यम ३. खराब | कुटुंबातील सज्ञान सदस्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पाण्याची सुविधा आहे का ? १. होय २ नाही | असल्यास पाणी मिळण्याचा स्त्रोत कोणता ? २. शासकीय नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर) ४.खाजगी नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर). ६. वैयक्तिक विहीर ८. खाजगी विहीर आहे परंतु सार्वजनिक वापर असणारी आहे १०. हात पंप १२.कुप नलिका (Tube well) १४. अन्य स्त्रोत | | | |
| | | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| नोट- हात धुण्याच्या घटना |
|---|
| **जेवणापूर्वी व नंतर , स्वयंपाक करण्यापूर्वी, शौचास जाऊन आल्यावर,बाळाचे शौच धुतल्यावर साबणाने हात धुणे आवश्यक आहे** |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक १.१ | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पडताळणीचा दिनांक- | | | | | | | | | | |
| पायाभूत सर्वेक्षण २०१२ आणि पायाभूत सर्वेक्षण २०१२ मधून सुटलेल्या कुटुंबांच्या व्यतिरिक्त अन्य अस्तित्वात असलेल्या कुटुंबांची माहिती (SBM-MIS वर उपलब्ध नसलेली कुटुंबे ) | | | | | | | | | | |
| अ क्र | कुटुंब प्रमुखाचे नाव | १. दारिद्र्य रेषेखालील (BPL) २. दारिद्र्य रेषेवरील (APL) | खालील पैकी प्रवर्ग नमूद करावा २. SC ४. ST ६. SMF ८. LLL १० PH १२. WH १४ Other | घर क्रमांक नमूद करावा. | रेशन कार्ड क्रमांक. | कुटुंबांतील एकूण सदस्य संख्या. | कुटुंबातील ५ वर्षाखालील मुलांची एकूण संख्या. | कुटुंबातील एकूण दिव्यांग सदस्य संख्या. | सदर कुटुंबाकडे स्वतःचे वैयक्तिक शौचालय आहे का ? १. होय २. नाही | स्वतः चे वैयक्तिक शौचालय नसल्यास शौचालय वापराचा खालील पैकी प्रकार नमूद करावा २. सामायिक शौचालय ४. समुदाय शौचालय ६. सार्वजनिक शौचालय ८. उघड्यावर जातात |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

सूचना SC - अनुसूचीत जाती
ST- अनुसूचीत जमाती
SMF- छोटे व सीमान्त शेतकरी
LLL- भूमिहीन मजूर
WH- महिला कुटुंब प्रमुख
Other- अन्य

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक २ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंगणवाडी स्वच्छता | | | | | | | | | | | |
| जिल्हा- | | | | तालुका- | | | ग्रामपंचायत- | | | गावाचे नाव- वाडीचे नाव- | |
| क्रमांक | अंगणवाडीचे नाव | अंगणवाडी क्रमांक | अंगणवाडी चा प्रकार १. मिनी अंगणवाडी २. अंगणवाडी केंद्र | एकूण मुलांची संख्या | एकूण मुलींची संख्या | एकूण विद्यार्थी | शौचालय सुविधा आहे का ? १. होय २. नाही | असल्यास | | | |
| | | | | | | | | शौचालय सुविधेचा प्रकार कोणता आहे ? १. शासकीय मालकीचे २. खाजगी मालकीचे | शौचालयाचा तांत्रिक प्रकार नमूद करावा १. एक शोषखड्डा २. दोन शोषखड्डा ३. सेप्टिक टँक ४. बायोग्यस ५. दिव्यांग ६. इतर | एक शोषखड्डा किंवा दोन शोष खड्डा शौचालय असल्यास एक खड्डा भरलेला आहे का ? १. होय २. नाही | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास २. सेप्टिक टँक च्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे ४.मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे ६. मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक २ | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंगणवाडी स्वच्छता | | | | | | | | |
| क्रमांक | अंगणवाडीचे नाव | | | | पाण्याची उपलब्धता | | हात धुण्याची सुविधा उपलब्ध आहे का ? १. होय २. नाही | स्वाक्षरी (सेविका) |
| | | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास, शौचालयाला गॅस पाईप बसविण्यात आला आहे का? १. होय २. नाही | शौचालय वापरात आहे का ? १. होय २. नाही | वापर नसल्यास कारण कोणते? १. पाणी नाही २. नादुरुस्त आहे ३. मानसिकता नाही | पाण्याची सुविधा आहे का ? १.होय २. नाही | असल्यास पाणी मिळण्याचा स्रोत कोणता ? २. शासकीय नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर) ४.खाजगी नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर). ६. वैयक्तिक विहीर ८. खाजगी विहीर आहे परंतु सार्वजनिक वापर असणारी आहे १०. हात पंप १२.कुप नलिका (Tube well) १४. अन्य स्रोत | | |
| | | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ३ | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शालेय स्वच्छता | | | | | | | | | | | | | | | | | |
| जिल्हा- | | | | | तालुका- | | | | ग्राम पंचायत- | | | | गावाचे नाव- | | | वाडीचे नाव | |
| क्रमांक | शाळेचे नाव | शाळेचा प्रकार कोणता? २. शासकीय ४.शासनमान्य ६. खाजगी शाळा | शाळेचा स्तर कोणता २. प्राथमिक ४. पूर्ण प्राथमिक ६. माध्यमिक ८. उच्च माध्यमिक विद्यालय | विद्यार्थ्यानुसार शाळेचा प्रकार कोणता ? २. केवळ मुलींची शाळा ४.केवळ मुलांची शाळा ६.मुलगे आणि मुलींची एकत्रित शाळा | एकूण मुलांची संख्या | एकूण मुलींची संख्या | एकूण विद्यार्थी | एकूण विद्यार्थांपैकी दिव्यांग विद्यार्थी | शौचालय सुविधा १. आहे २. नाही | असल्यास | | | | | | | |
| | | | | | | | | | | २. केवळ मुलांसाठी ४. केवळ मुलींसाठी ६. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र | शौचालय सुविधेचा प्रकार कोणता? १.शासकीय मालकीचे २. खाजगी मालकीचे | शौचालायचा तांत्रिक प्रकार नमूद करावा २. एक शोषखड्डा ४. दोन शोषखड्डा ६. सेप्टिक टँक ८. बायोग्यस १०. दिव्यांग १२. इतर | एक शोषखड्डा किंवा दोन शोष खड्डा असल्यास एक खड्डा भरलेला आहे का ? १. होय २. नाही | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास २. सेप्टिक टँक च्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे ४.मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे ६. मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास गॅस पाईप बसविण्यात आला आहे १. होय २. नाही | शौचालय वापरात आहे १. होय २. नाही | वापर नसल्यास कारण कोणते? १. पाणी नाही २. नादुरुस्त आहे ३. मानसिकता नाही |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ३

### शालेय स्वच्छता

| क्रमांक | शाळेचे नाव | मुतार्‍यांची सुविधा उपलब्ध आहे का ? १. होय २. नाही | असल्यास | | | पाण्याची उपलब्धता | | हात धुण्याची सुविधा उपलब्ध आहे का ? १. होय २. नाही | स्वाक्षरी (मुख्याध्यापक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुलांसाठी किती मुतार्‍या आहेत ? | मुलींसाठी किती मुतार्‍या आहेत ? | मुतर्‍यांचा वापर कसा आहे ? २. केवळ मुलींच्या मुतार्‍या वापरात आहेत ४. केवळ मुलांच्या मुतार्‍या वापरात आहेत ५. मुलामुलींच्या मुतार्‍या वापरात आहेत | पाण्याची सुविधा आहे /नाही | असल्यास पाणी मिळण्याचा स्त्रोत कोणता ? २. शासकीय नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर) ४.खाजगी नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर). ६. वैयक्तिक विहीर ८. खाजगी विहीर आहे परंतु सार्वजनिक वापर असणारी आहे १०. हात पंप १२.कुप नलिका (Tube well) १४. अन्य स्त्रोत | | |
| | | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ४ | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक शौचालय | | | | | | | | | | | | | | | | |
| जिल्हा- | | | | | तालुका- | | | | | गावाचे नाव- | | | वाडीचे नाव | | | |
| क्रमांक | सार्वजनिक शौचालयाचे ठिकाण | शौचालयातील शौचालय सीट ची संख्या | महिलां साठी व पुरुषां साठी स्वतंत्र शौचालय सीट उपलब्ध आहे का १. होय २. नाही | वापरात असलेले शौचालय सीट संख्या | वापरात नसलेले शौचालय सीट संख्या | एकूण मुतार्यांची संख्या | वापरात असलेल्या मुतार्याची संख्या | वापरात नसलेल्या मुतार्याची संख्या | शौचालय संकुल कोणामार्फत वांधले आहे - शासकीय/ खाजगी | शासकीय असल्यास योजनेचे नावाचा क्रमांक नमूद करावा - २. संपूर्ण स्वच्छता अभियान ४. निर्मल भारत अभियान ६. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) ८. १४ वित्त आयोग १०. ग्राम निधि १२. आमदार खासदार निधि १४. अन्य निधी | शौचालायचा तांत्रिक प्रकार नमूद करावा २. एक शोषखड्डा ४. दोन शोषखड्डा ६. सेप्टिक टँक ८. वायोग्यस १०. दिव्यांग १२. इतर | एक शोषखड्डा किंवा दोन शोष खड्डा असल्यास एक खड्डा भरलेला आहे का ? १. होय २. नाही | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास खालील पैकी क्रमांक नमूद करावा - १. सेप्टिक टँकच्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे २.मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे ३. मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास गॅस पाईप वसविण्यात आला आहे का ? १. होय २. नाही | शौचालयाचा वापर आहे का ? १. होय २.नाही | वापर नसल्यास कारण कोणते? १. पाणी नाही २. नादुरुस्त आहे ३. मानसिकता नाही |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | | |

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ४**

**सार्वजनिक शौचालय**

| क्रमांक | सार्वजनिक शौचालयाचे ठिकाण | पाण्याची उपलब्धता | | हात धुण्याची सुविधा उपलब्ध आहे का ?<br>१. होय<br>२. नाही | मासिकपाळी व्यवस्थापन बाबत सुविधा | | | एकंदर स्वच्छता कशी आहे ?<br>१. चांगली<br>२. मध्यम<br>३. खराब आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाण्याची सुविधा आहे का ?<br>१. होय<br>२. नाही | असल्यास पाणी मिळण्याचा स्त्रोत कोणता<br>२. नळ पाणी पुरवठा<br>४. विहीर<br>६. हात पंप<br>८. कुप नलिका (Tube well)<br>१०. अन्य स्त्रोत | | उपलब्ध आहे का ?<br>१. होय<br>२. नाही | Incinerator उपलब्ध आहे का ?<br>१. होय<br>२. नाही | changing room उपलब्ध आहे का ?<br>१. होय २. नाही | |
| | | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ५ | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| समुदाय शौचालय | | | | | | | | | | | | | |
| जिल्हा- | | | | | तालुका | | ग्राम पंचायत - | | | गावाचे नाव- | | | वाडीचे नाव |
| क्रमांक | समुदाय शौचालयाचे ठिकाण | शौचालयातील शौचालय सीटची एकूण संख्या | महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र सीट उपलब्ध आहे का ? १. होय २. नाही | वापरात असलेले शौचालय सीट संख्या किती आहे? | वापरात नसलेले शौचालय सीट संख्या किती ? | शौचालय संकुल कोणामार्फत वांधले आहे - १. शासकीय २. खाजगी | शासकीय योजनेमधून बांधकाम झाले असल्यास योजनेचे नाव नमूद करावे -- २. संपूर्ण स्वच्छता अभियान ४. निर्मल भारत अभियान ६. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) ८. १४ वित्त आयोग १०. ग्राम निधि १२. आमदार खासदार निधि १४. अन्य निधी | शौचालयाचा तांत्रिक प्रकार नमूद करावा १. एक शोषखड्डा २. दोन शोषखड्डा ३. सेप्टिक टँक ४. बायोग्यस ५. दिव्यांग ६. इतर | एक शोषखड्डा किंवा दोन शोष खड्डा असल्यास एक खड्डा भरलेला आहे का ? होय/नाही | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास खालील पैकी क्रमांक नमूद करावा १. सेप्टिक टँक च्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे २.मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे ३. मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे | सेप्टिक टँकचे शौचालय असल्यास गॅस पाईप वसविण्यात आला आहे का? १. होय २. नाही | शौचालयाचा वापर आहे का ? १. होय २. नाही | वापर नसल्यास कारण कोणते? १. पाणी नाही २. नादुरुस्त आहे ३. मानसिकता नाही |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हागणदारीमुक्त ग्रामपंचायत पडताळणी टप्पा -२ करिता प्रपत्र -क्रमांक ५ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| समुदाय शौचालय | | | | | | | |
| क्रमांक | समुदाय शौचालयाचे ठिकाण | पाण्याची उपलब्धता | | हात धुण्याची सुविधा उपलब्ध आहेका ? १. होय २. नाही | मासिक पाळी व्यवस्थापन बाबत सुविधा | | एकंदर स्वच्छता कशी आहे ? १. चांगली २. मध्यम ३. खराब आहे |
| | | पाण्याची सुविधा आहे का ? १. होय २. नाही | असल्यास पाणी मिळण्याचा स्त्रोत कोणता? १ नळ पाणी पुरवठा २. विहीर ३. हात पंप ४. कुप नलिका (Tube well) ५. अन्य स्त्रोत | | Incinerator आहे का ? १. होय २. नाही | changing room आहे का ? १. होय २.नाही | |
| | | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

पृष्ठ ३३ पैकी २२

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हागनदारी मुक्त ग्राम पंचायत टप्पा २ पडताळणी** | | | | | | |
| **पडताळणी समिती ची माहिती - प्रपत्र अ** | | | | | | |
| जिल्हा | तालुका | ग्राम पंचायत | सदस्याचे नाव (अध्यक्ष यांचे सह) | पद | भ्रमणध्वनी क्रमांक | email id |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांनी राज्य स्तरावर सादर करावयाचा अहवाल खालील प्रमाणे-

प्रपत्र-ब

हागनदारी मुक्त ग्राम पंचायत टप्पा २ अंतर्गत जिल्ह्यातील -----ग्राम पंचायतीपैकी -------ग्राम पंचायतींची पडताळणी शासन निर्णय --------प्रमाणे पूर्ण करण्यात आली आहे. सदर ग्राम पंचायतींची यादी खालील प्रमाणे आहे .

| तालुक्याचे नाव | पडताळणी पूर्ण झालेल्या ग्राम पंचायतीचे नाव | पडताळणी पूर्ण केलेला दिनांक | सदर ग्राम पंचायत हागनदारी मुक्त आहेनाही/ | सदर ग्राम पंचायत हागनदारी मुक्त नसल्यास त्यामागील कारणे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वरील ग्राम पंचायती केंद्र शासनाच्या sbm.gov.in या संकेत स्थळावर C २४ या दुव्यातून नोंदीत करण्यास परवानगी असावी.

स्वाक्षरी

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद-------

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हागनदारी मुक्त ग्राम पंचायत पडताळणी टप्पा -२ | | | | | | | | | | | | | | | | | |
| घोषवारा प्रपत्र -१ (कुटुंब स्तर शौचालय सुविधा,वापर,स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती ) | | | | | | | | | | | | | | | | | |
| अक्र | जिल्हा | तालुक्याचे नाव | ग्राम पंचायतचे नाव | एकूण कुटुंवे | | | | | | | शौचालय असलेल्या कुटुंवापैकी | | | | | एक खड्डा शौचालयापैकी खड्डा भरलेली शौचालये | दोन खड्डा शौचालयापैकी खड्डा भरलेली शौचालये |
| | | | | शौचालय असलेली कुटुंबे | | | | | शौचालय नसलेली कुटुंवे | एकूण कुटुंबे (शौचालय असलेली + शौचालय नसलेली) | एक खड्डा शौचालय असलेली कुटुंवे | दोन शोषखड्डा शौचालय असलेली कुटुंबे | सेप्टिक टँक शौचालय असलेली कुटुंवे | वायोग्यस शौचालय असलेली कुटुंबे | दिव्यांग शौचालय असलेली कुटुंवे | | |
| | | | | वैयक्तिक शौचालय असलेली कुटुंबे | सामायिक शौचालय असलेली कुटुंबे | समुदाय शौचालय असलेली कुटुंबे | सार्वजनिक शौचालय असलेली | एकूण शौचालय असणारी कुटुंबे | | | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

**स्वाक्षरी,**
**गटविकास अधिकारी, पंचायत समिती**

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हागनदारी मुक्त ग्राम पंचायत पडताळणी टप्पा -२ | | | | | | | | |
| घोषबारा प्रपत्र -१ (कुटुंब स्तर शौचालय सुविधा,वापर,स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती ) | | | | | | | | |
| सेप्टिक टँक असलेल्या शौचालयापैकी | | | | नादुरुस्त असणारी शौचालये | वापर नसणारी शौचालये | छोट्या मुलांचे शौच शौचालयात टाकणारी कुटुंबे | छोट्या मुलांचे शौच उघड्यावर टाकणारी कुटुंबे | हात धुण्याची सवय असणारी कुटुंबे |
| सेप्टिक टँक च्या शेवटी जोडण्यात आलेल्या पाईप मधून मैला मिश्रित पाणी उघड्यावर सोडले आहे अशी स्थिति असणारी शौचालये | मैला मिश्रित पाण्याचा पाईप शोष खड्ड्यात सोडला आहे अशी स्थिति असणारी शौचालये | मैला मिश्रित पाणी उघड्यावर दिसून येत नाही त्याचे व्यवस्थापन अन्य सुरक्षित मार्गाने केले आहे अशी स्थिति असणारी शौचालये | गॅस पाईप न बसवलेली शौचालये | | | | | |
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी,
गटविकास अधिकारी, पंचायत समिती

| स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हागनदारी मुक्त ग्राम पंचायत पडताळणी टप्पा -२ | | | | | | | | |
| घोषवारा प्रपत्र -१ (कुटुंब स्तर शौचालय सुविधा,वापर,स्वच्छता विषयक आणि पाणी सुविधा विषयक स्थिती) | | | | | | | | |
| पाणी सुविधा नसणारी कुटुंबे | पाणी सुविधा असणारी कुटुंबे | पाणी सुविधा असलेल्या कुटुंबांपैकी | | | | | | |
| | | शासकीय नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर) असणारी कुटुंबे | खाजगी नळ पाणी पुरवठा (वैयक्तिक स्तर) असणारी कुटुंबे | वैयक्तिक विहीर असणारी कुटुंबे | खाजगी विहीर परंतु सार्वजनिक वापर असणारी कुटुंबे | हातपंप अंतर्गत पाणी सुविधा मिळणारी कुटुंबे | कुप नलिका अंतर्गत पाणी सुविधा असणारी कुटुंबे | अन्य पाण्याचे स्रोत मार्फत पाणी मिळणारी कुटुंबे |
| २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी,
गटविकास अधिकारी, पंचायत समिती

## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

## हागनदारी मुक्त ग्राम पंचायत पडताळणी टप्पा -२

## घोषवारा प्रपत्र - २ (अंगणवाडी स्वच्छता)

| अक्र | जिल्हा | तालुक्याचे नाव | ग्राम पंचायत नाव | एकूण अंगणवाड्यांची संख्या | पैकी मिनी अंगणवाड्यांची संख्या | मिनी अंगणवाडी पैकी | | | | | एकूण अंगणवाडी पैकी अंगणवाडी केंद्र असलेल्या | अंगणवाडी केंद्र असलेल्या मध्ये | | | | | शौचालय नादुरुस्त असणाऱ्या मिनी अंगणवाड्या | शौचालय नादुरुस्त असणाऱ्या अंगणवाडी केंद्रे | नळाद्वारे पाण्याची सुविधा असलेल्या मिनी अंगणवाड्या | नळाद्वारे पाण्याची सुविधा असलेली अंगणवाडी केंद्रे | कोणतीही पाणी सुविधा नसणाऱ्या मिनी अंगणवाड्यांची संख्या | कोणतीही पाणी सुविधा नसणाऱ्या अंगणवाडी केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शौचालय असलेल्या | | | शौचालय नसलेल्या मिनी अंगणवाडी | शौचालय असलेल्या पैकी नादुरुस्त शौचालय असलेल्या | | शौचालय असलेल्या | | | शौचालय नसलेल्या | शौचालय असलेल्या पैकी नादुरुस्त शौचालय असलेल्या | | | | | | |
| | | | | | | शासकीय मालकीचे शौचालय असलेल्या | खाजगी मालकीच्या शौचालय असलेल्या | एकूण | | | | शासकीय मालकीचे शौचालय असलेल्या | खाजगी मालकीच्या शौचालय असलेल्या | एकूण | | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**स्वाक्षरी,**
**गटविकास अधिकारी, पंचायत समिती**